Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

११/२०२१

दि.२७ ऑक्टोबंर,२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार **दि.१८ नोव्हेंबर २०२०** रोजीचा **शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा वर्धापन दिन** कोवीड–१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे ध्वजारोहन करून साजरा करण्यात आलेला आहे. प्रत्येक वर्षी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचां–यांच्या पाल्यांना शैक्षणिक गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र व बक्षीस (रोख रक्कम) देवून गौरव केला जातो. परंतु कोवीड–१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२० मधील विद्यापीठ वर्धापनदिनी देण्यात येणारे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचां–यांच्या पाल्यांना शैक्षणिक गुणवत्तेबाबत प्रमाणपत्र देवून बक्षीस धनादेश स्वरूपात पाठविण्यात येणार आहेत.

तेंव्हा विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा–यांनी आपल्या पाल्यांची शैक्षणिक गुणवत्तेची माहिती **विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिलेल्या मधील गुगल फॉर्ममध्ये भरावी व फॉर्मची हॉर्ड कॉपी कागदपत्रासह आस्थापना विभागात दि.१०/०३/२०२१ पर्यंत देण्यात यावी.** विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या पाल्यांचा गुणवत्ता गौरव याबाबतची नियमावली व निकष  सोबत प्रमाणे जोडले आहेत.

- **गुगल फॉर्मची लिंक पुढील प्रमाणे https://forms.gle/F३ob८pvHPJKS३nJz८**

प्र.कुलसचिव

**जा.क्र.आस्थापना/** 737
**दिनांक –** 3 MAR 2021
**प्रति,**

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, रेक्टर्स व सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
२. मा. कुलगुरु, मा. कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन, व मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास
३. इंटरनेट विभाग – सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

टीप–सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, यांच्या निदर्शनास आणावे.

विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या पाल्यांचा गुणवत्ता गौरव याबाबतची नियमावली व निकष

**अ – विद्यापीठातील शिक्षकांच्या व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शैक्षणिक बाबतीत मिळविलेली गुणवत्ता विचारात घेऊन विद्यापीठातर्फे प्रदान करावयाच्या पारितोषिकांचा तपशील**

- इयत्ता दहावीमध्ये (S.S.C.) सर्वप्रथम 3 – अनुक्रमे रु.2000/–,रु.1500/–, रु.1000/–
- इयत्ता बारावीमध्ये (H.S.C.) विद्याशाखानिहाय सर्वप्रथम प्रत्येकी 1 – रु.2000/– प्रत्येकी.
- पदवी परीक्षांमध्ये खालीलप्रमाणे सर्वप्रथम येणा–यास प्रत्येकी रु.2000/–
    - बी.ए.
    - बी.कॉम.
    - बी.एस्सी.
    - अन्य पदवी परीक्षेतील दोन परीक्षा
- पदव्युत्तर पदवी परीक्षांमध्ये खालीलप्रमाणे सर्वप्रथम येणा–यास प्रत्येकी रु.2000/–
    - एम .ए.
    - एम .कॉम.
    - एम .एस्सी.
    - अन्य पदव्युत्तर परीक्षेतील दोन परीक्षा
- संबंधित शिक्षक/ प्रशासकीय सेवकांच्या मुलास विद्यापीठातर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच विद्यापीठाच्या वार्षिक अहवालामध्ये सत्कार समारंभाचा योग्य त्या मथळयाखाली उल्लेख केला जाईल.

**ब – विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांचा गुणवत्ता गौरव करताना विचारात घेतल्या जाणा–या बाबी :**

१. दरवर्षी विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांपैकी स्वतंत्रपणे दहावी गुणानुक्रमे पहिले तीन, बारावी विद्याशाखानिहाय तीन (प्रत्येक शाखेतून एक फक्त), पदवी व पदव्युत्तर परीक्षेत विद्याशाखानिहाय तीन (प्रत्येक शाखेतून एक फक्त).

२. याबाबतीत कमीत कमी 60 टक्के गुण प्रत्येक परीक्षेत मिळविणे अनिवार्य राहील.

३. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर स्तरावर मिळविलेल्या गुणांचा/यशाचा तपशील

४. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी खेळामध्ये, सांस्कृतिक कार्यामध्ये व विविध स्पर्धामध्ये मिळविलेले विशेष प्राविण्य.

५. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी कोणत्या आर्थिक परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले आहे त्याचा तपशील

६. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्पर्धात्मक परीक्षेत सहभाग घेतला असल्यास त्यात मिळविलेल्या यशाचा तपशील .

७. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर करीत असलेले कामकाज/कार्य याचा तपशील.

८. संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी केलेल्या विशेष उल्लेखनीय कामगिरीचा तपशील.